# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई, यांचे कार्यालय

राज्य उत्पादन शुल्क भवन, प्लॉट नं.१४५०,बृहन्मुंबई महानगरपालिका सभागृह मार्ग,फोर्ट-मुंबई- ४०० ००१.
Email:jcadmin-excise@mah.gov.in Phone no.०२२-२०८२२४७७

प्रति,

लघुटंकलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक, राज्य उत्पादन शुल्क
पदासाठी लेखी परिक्षेत पात्र झालेले सर्व उमेदवार

**क्रमांक:-** इएसटी ११२०२४/३४/लघुलेखक भरती/२-ब, मुंबई, दि. ४ फेब्रुवारी, २०२५

विषय :- राज्य उत्पादन शुल्क विभागातील लघुलेखक (नि.श्रे.)व लघुटंकलेखक पदाच्या भरती प्रक्रियेत पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांची लघुलेखन कौशल्य व्यावसायिक चाचणी परीक्षा घेणेबाबत.

संदर्भ:या कार्यालयाचे सुधारित जाहीरात क्र.इएसटी ११२२/पदभरती २०२२/३२/२अ-३ दि.१७.११.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन सुधारित जाहीरातीनुसार या विभागातील लघुलेखक (निम्नश्रेणी) ०५ पदांकरिता व लघुटंकलेखक १८ पदांसाठी मे.टाटा कन्स्लटन्सी सर्व्हीसेस लि(T.C.S)यांचे मार्फत घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची लघुटंकलेखक व लघुलेखक(निम्नश्रेणी) या पदावर अंतिम निवड करण्यापूर्वी लघुलेखन कौशल्य व्यावसायिक चाचणी परिक्षा घ्यावयाची आहे.

तरी सर्व पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, सुधारित जाहीरातीच्या दिनांकास धारण करित असलेल्या लघुलेखनाच्या पात्रतेनुसार त्यांनी मे.टाटा कन्स्लटन्सी सर्व्हीसेस लि(T.C.S) यांचेकडे भरलेल्या फॉर्मनुसार त्यांना लघुलेखनाची व्यावसायिक चाचणी मराठी किंवा इंग्रजी या भाषेतून किंवा दोन्ही भाषेतून दयावयाची आहे ? तसेच त्यांना लघुटंकलेखक (मराठी किंवा इंग्रजी) व निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी किंवा इंग्रजी) यापैकी कोणत्या पदासाठी पसंतीक्रम दयावयाचा आहे ? तसेच त्यांना व्यावसायिक चाचणी साठी कोणत्या जिल्हयाचा पसंतीक्रम दयावयाचा आहे, याबाबतची माहिती सोबत जोडण्यात आलेल्या विहीत विवरणपत्रात आवश्यक त्या पुराव्यादाखल कागदपत्रासह ८ दिवसात excise.estmaharashtra@gmail.com या इमेलवर पाठवावी.

सदरची माहिती विहीत मुदतीत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास आपल्याला लघुलेखन कौशल्य व्यावसायिक चाचणी देण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे गृहीत धरण्यात येईल, याची सर्व पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**मा.आयुक्तांचे मान्यतेने**

सोबत:विहीत विवरणपत्र

(सुनिल चव्हाण)
सह आयुक्त (प्रशासन)
राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई

जाहीरात क्र.इएसटी ११२२/पदभरती२०२२/३२/२अ-३, दिनांक १७.११.२०२३

**राज्य उत्पादन शुल्क विभागातील लघुटंकलेखक(Steno Typist) /निम्नश्रेणी लघुलेखक(L.G. Stenographer) या पदासाठी पात्र झालेल्या उमेदवारांची कौशल्य व्यावसायिक चाचणी घेण्यासाठी आवश्यक माहिती मागविण्याबाबत विवरणपत्र**

| अ.क्र. | व्यावसायिक चाचणी परिक्षेस पात्र उमेदवारांशी संबंधित मुद्दे | आवश्यक माहिती |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे नाव | --- |
| २ | सुधारित जाहीरातीच्या दिनांकास टिसीएस कडे भरलेल्या फॉर्मनुसार अर्जदाराने कोणत्या पदासाठी अर्ज केला आहे<br>(लघुटंकलेखक-Steno Typist)<br>(निम्नश्रेणी लघुलेखक-Lower grade Stenographer) | |
| ३ | मोबाईल नं. | |
| ४ | ईमेल आयडी | |
| ५ | सुधारित जाहिरातीच्या दिनांकास **लघुटंकलेखक(Steno Typist)**पदासाठी टिसीएस कडे भरण्यात आलेल्या फॉर्मसोबत लघुलेखनाचे ८० शब्द प्रति मिनिट गतीचे मराठी किंवा इंग्रजी (Short hand Certificate Marathi/English) यापैकी कोणत्या भाषेचे प्रमाणपत्र सादर केले आहे.<br>**टिप: मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेची लघुलेखनाची प्रमाणपत्रे सादर केली असल्यास तसे नमूद करावे.** | |
| ६ | सुधारित जाहिरातीच्या दिनांकास **निम्नश्रेणी लघुलेखक (Lower grade Stenographer)** पदासाठी टिसीएस कडे भरण्यात आलेल्या फॉर्मसोबत लघुलेखनाचे १०० शब्द प्रति मिनिट गतीचे मराठी किंवा इंग्रजी (Short hand Certificate Marathi/English) यापैकी कोणत्या भाषेचे प्रमाणपत्र सादर केले आहे.<br>**टिप: मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेची लघुलेखनाची प्रमाणपत्रे सादर केली असल्यास तसे नमूद करावे.** | |
| ७ | जर **लघुटंकलेखक (Steno Typist)** पदासाठी लेखी परिक्षेमध्ये पात्र असाल तर, **मराठी लघुटंकलेखक (Marathi StenoTypist) व इंग्रजी लघुटंकलेखक (English StenoTypist)** यापैकी कोणत्या पदासाठी पसंतीक्रम दयावयाचा आहे.? | |
| ८ | जर **निम्नश्रेणी लघुलेखक (Lower grade Stenographer)** पदासाठी लेखी परिक्षेमध्ये पात्र असाल तर,मराठी नि.श्रे.लघुलेखक( Marathi Lower grade Stenographer) व इंग्रजी नि.श्रे.लघुलेखक (English Lower grade Stenographer) यापैकी कोणत्या पदासाठी पसंतीक्रम दयावयाचा आहे? | |
| ९ | जर **लघुटंकलेखक (Steno Typist) व निम्नश्रेणी लघुलेखक(Lowergrade Stenographer)**या दोन्हीही पदासाठी लेखी परिक्षाअंती पात्र असाल तर यापैकी कोणत्या पदासाठी कौशल्य व्यावसायिक चाचणी देणार आहात. जर | |

| | | |
|---|---|---|
| | दोन्ही पदासाठी देणार असाल तर खालील पर्यायाची निवड करा<br>अ)लघुटंकलेखक (Stenotypist)<br>ब)निम्नश्रेणी लघुलेखक(Lowergrade Stenographer<br>क)दोन्ही पदासाठी<br>**(टिप: कौशल्य व्यावसायिक चाचणी परिक्षा मराठी अथवा इंग्रजी मधून देणार, याबाबत अनु.क्र. ५ ते ८ मध्ये आवश्यकतेनुसार माहिती नमूद करावी)** | |
| १० | लघुटंकलेखक (Steno Typist) व लघुलेखक(निम्नश्रेणी) (Lowergrade Stenographer) पदासाठी लघुलेखनाची व्यावसायिक चाचणी कोणत्या जिल्हयात देणे सोयीस्कर होईल?<br>**(टिप:-उपरोक्त नमूद पदांपैकी एका पदासाठी किंवा दोन्ही पदासाठी लघुलेखनाची कौशल्य व्यावसायिक चाचणी देणार असल्यास, त्यासाठी एकाच जिल्हयाचा पसंतीक्रम देण्यात यावा.)** | |

**टिप**: उपरोक्त तक्त्यातील माहिती सोबत लघुटंकलेखक-Stenotypist व लघुलेखक(निम्नश्रेणी)-Lowergrade Stenographer या दोन्ही पदासाठी सुधारित जाहीरातीनुसार टिसीएस कडे भरलेला फॉर्म व लघुलेखनाच्या (Short hand certificate) प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडण्यात यावी.

ठिकाण:मुंबई

दिनांक: फेब्रूवारी, २०२५

( )

उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी